झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनीः ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email : info@sra.gov.in

परिपत्रक क्र. ७०० क्र.झोपुप्रा/न.भू./कार्यासन-१/टे.एस.१सामिलिकरण/पोटविभाजन/मंजूरी/०९
दिनांक : १८ ०६ २००९

## परिपत्रक

विषय : झोपडपट्टी प्राधिकरणा अंतर्गत येणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील मिळकतींचे पोटविभाजन/सामिलीकरण बाबत.

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हया मधील झोपडपट्टी क्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे कामी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सक्षम आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावली १९९१ चे नियम ३३|१०| मधील शासनाची अधिसूचना क्र.डी.सी.आर.१०९५ /२०९ /सीआर२७३ /९५/यूडी११ दिनांक : १५/१०/१९९७ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा विविध प्रकारच्या मंजू-या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून देण्यात येत आहे. त्यानुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरातील सर्व झोपडपट्टी व्याप्त जमिनीचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या मंजूरी प्रमाणे/निकषाप्रमाणे पोटविभाजन/सामिलीकरण करण्याचे आदेश प्राधिकरणातर्फे निर्गमीत केले जातात व याबाबत जिल्हाधिकारी म्हणून स्वतत्र आदेश घेण्याची आवश्यकता नाही. त्याप्रमाणे अधिक्षक नगर भूमापन व भूमी अभिलेख मुंबई शहर व सर्व नगर भूमापन अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी नगर भूमापन नकाशा व दुरुस्ती मिळकत पत्रिका उघडून कार्यवाही करण्याची आहे. पोटविभाजन/सामिलीकरण करताना नगर भूमापन क्रमांक व क्षेत्रामध्ये काही बदल झाल्यास त्याप्रमाणे अहवाल झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर करण्याचा असून त्या नुसार सुधारीत आदेश प्राधिकरणा तर्फे निर्गमीत करण्यात येतील. सदरची कार्यवाही त्वरीत व तात्काळ करण्याची आहे जेणे करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची प्रकरणे जलद निकाली निघून योजना पूर्णत्वास मदत होईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण